सोमवार दिनांक ९ मे, २०२२ रोजी सायं.५.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे संपन्न झालेल्या नाशिक जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त.

सभेस उपस्थित असलेल्या अधिकारी /सभासद व उद्योजक यांची यादी सोबत जोडली आहे.

सर्वप्रथम श्री.संदीप पाटील, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र तथा सदस्य-सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरूवात केली व सभा बोलविण्याचा उद्देश विषद केला.

मागील जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या सभांमध्ये निर्यात कृती आराखडा मसूदाचे सादरीकरण करून वेळोवेळी उपस्थित निर्यातदार उद्योजक यांनी केलेल्या आवश्यक सूचनांचा समावेश नव्याने करण्यात आलेल्या जिल्हा कृती आराखडा मध्ये करण्यात आला आहे असे सदस्य-सचिव यांनी सभेत सांगितले. तसेच नव्याने केलेला जिल्हा निर्यात कृती आराखडयाचे सादरीकरण सभेमध्ये करण्यात आले. त्यामध्ये नाशिक जिल्ह्यातून सद्यस्थितीत निर्यात होणा-या उत्पादनांची माहिती देण्यात आली आहे तसेच भविष्यात निर्यात होवू शकणा-या उत्पादनांची माहिती अंतर्भूत करण्यात आलेली आहे. सदरची माहिती ही विदेश व्यापार संचालनालय, पुणे यांचेकडे उपलब्ध असलेल्या माहितीवरून घेण्यात आलेली आहे. नाशिक जिल्ह्यातून प्रामुख्याने निर्यात होणा-या ५ उत्पादनांवर त्यात भर देण्यात येत असल्याचे सदस्य-सचिव यांनी सभेत सांगितले. तसेच उद्योजकांचे उत्पादन निर्यात होण्याच्या दृष्टीने येणा-या मुलभूत अडीअडचणींचा देखील समावेश करण्यात आलेला असून त्या अडचणी सोडविण्यासाठी काय उपाययोजना कराव्या लागणार आहेत याचा देखील या निर्यात कृती आराखडा मध्ये समावेश करण्यात आला आहे, असेही सदस्य-सचिव यांनी सभेत सांगितले. तसेच जिल्हा निर्यात प्रचालन समितीने करावयाच्या कार्यवाहीची माहिती देखील अंतर्भूत केली आहे असे सांगितले.

त्याचप्रमाणे निर्यात वाढण्याच्या दृष्टीने आवश्यक मुलभूत सुविधा कशा पद्धतीने निर्माण होवू शकतील याविषयीचा एक कालबद्ध कार्यक्रम करण्यात आला असून त्याचा देखील समावेश जिल्हा निर्यात कृती आराखडामध्ये करण्यात आला आहे. तसेच केंद्र शासनाच्या वाणिज्य मंत्रालय व विदेश व्यापार संचालनालय, यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचनांनूसार हा आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

विदेश व्यापार संचालनालय, पुणे यांचे सह संचालक श्री.वरूण सिंग यांनी असे सांगितले की, वाणिज्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचेमार्फत जिल्हानिहाय निर्यात होवू शकेल अशा उत्पादनांबाबत लवकरच पोर्टल सुरू करणार आहेत. सध्याच्या धोरणामध्ये निर्यातदार घटकांसाठी उपलब्ध असलेल्या योजनांची माहिती दिली. तसेच देशभरातील एकुण ७५ जिल्ह्यांची पहिल्या टप्प्यात निवड करण्यात आली असून

Scanned by PDF Scanner

त्यात राज्यातील ४ जिल्हे निवडण्यात आले आहे व त्यात नाशिक जिल्ह्याची पहिल्या टप्प्यासाठी निवड करण्यात आलेली आहे असे सांगितले.

नाशिक जिल्ह्यातून द्राक्ष (Grapes), कांदा (Onion), बेदाणा (Dry Grapes) औषधे (Pharmaceutical Products) तसेच इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स कॉम्पोनन्टस् (Electrical & Electronics Components), ऑटो कॉम्पोनन्टस्(Auto Components) इ. उत्पादने प्रामुख्याने निर्यात होत आहेत. तसेच सन २०२२-२३ मध्ये या उत्पादनांपैकी सध्या होत असलेल्या निर्यातीच्या २५ टक्के वाढ होतील अशा **दोन** उत्पादनांची निवड करण्यास केंद्र शासनाने सूचविलेले असून त्याप्रमाणे नाशिक जिल्ह्यातून इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स कॉम्पोनन्टस् आणि बेदाणा (Dry Grapes) या उत्पादनांची निवड करण्यात आली आहे व त्यादृष्टीने संबंधीत निर्यातदार घटकांची सभा घेण्यात आली असल्याचे सदस्य-सचिव यांनी सांगितले. त्याप्रमाणे या उत्पादनांची निर्यात वाढण्याकरीता त्यांना लागणा-या आवश्यक मुलभूत सोयी-सुविधांविषयी चर्चा करण्यात आली असून उत्पादनांची गुणवत्ता वाढीवर भर देण्यात येत आहे असे सदस्य-सचिव यांनी सभेत सांगितले.

याप्रमाणे सविस्तर चर्चा झाल्यानंतर सदरचा जिल्हा निर्यात आराखडा अंतिम करण्यास उपस्थित सर्व सभासदांनी मान्यता दिली.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक तथा सदस्य-सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक मा.अध्यक्षांचे मान्यतेने सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

महाव्यवस्थापक,जिउकें
तथा सदस्य-सचिव,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक.

मा.जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक.

Scanned by PDF Scanner

सोमवार दिनांक ९ मे, २०२२ रोजी सायं.५.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे संपन्न झालेल्या निर्यात प्रचालन समिती, नाशिक च्या सभेस उपस्थित अधिकारी / उद्योजक यांची यादी.

१. मा.श्री.गंगाथरण डी, भा.प्र.से., जिल्हाधिकारी, नाशिक.
२. मा.श्री.वरूण सिंग, सह संचालक, विदेश व्यापार संचालनालय, पुणे.
३. मा.श्री.संदिप पाटील, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक.
४. मा.श्री.नितीन गवळी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक.
५. मा.श्री.प्रशांत वाघमारे, सहाय्यक महाव्यवस्थापक, अपेडा, मुंबई.
६. मा.श्री.लि.ज.येळवे, कृषी अधिकारी, जिल्हाअधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, नाशिक.
७. मा.श्री.जगन्नाथ खापरे, ग्रेप्स एक्सपोर्टस् असोसिएशन ऑफ इंडिया, नाशिक.
८. मा.श्री.आर.आर.पाटील, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, नाशिक.
९. मा.श्री.महेन्द्र भामरे, अध्यक्ष, वाईन असोसिएशन ऑफ इंडिया, नाशिक.
१०. मा.श्री.रमेश पवार, जिल्हा निर्यातदार संघटना, नाशिक.
११. मा.श्री.गोरख पगार, सचिव, वाईन असोसिएशन ऑफ इंडिया, नाशिक.
१२. मा.श्री.सुधाकर देशमुख, उपाध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, नाशिक.
१३. मा.श्री.मिलींद राजपूत, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, नाशिक.
१४. मा.श्री.जयदिप रातपूर, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, नाशिक.
१५. मा.श्री.नितीन वर्मा, प्रतिनिधी, HALCON, जानोरी, ता.दिंडोरी.
१६. मा.श्री.महेश बंजन, प्रतिनिधी, HALCON, जानोरी, ता.दिंडोरी.
१७. मा.श्री.गणेश शिंपी, प्रतिनिधी, मे.अल्कॉन इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक.
१८. मा.श्री.अक्षय राऊत, निर्यात आराखडा सल्लागार.

Scanned by PDF Scanner